| | |
|---|---|
| विषय क्र. ०१. दि.३० डिसेंबर, २०२२. | नवी मुंबई महानगरपालिकेचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल, आस्थापना व लेखा विवरणपत्र मा. प्रशासक, नवी मुंबई महानगरपालिका यांना सादर करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ३०/१२/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/प्रशा/आस्था-१/प्र.क्र.४६/३८१०/२०२२. |
| ठराव क्रमांक ३७१२ | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल, आस्थापना व लेखा विवरणपत्र मा. प्रशासक, नवी मुंबई महानगरपालिका यांना सादर करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९४(१) अन्वये आयुक्ताने प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासनाव्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशीलवार अहवाल व उक्त वषात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरित केलेल्या रकमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणा-या विवरणपत्रासहित तयार करुन स्थायी समितीस सादर केला पाहिजे, अशी तरतूद आहे.<br>तसेच उपरोक्त अधिनियमातील कलम ५१(२) अन्वये आयुक्ताने वेळोवेळी एक विवरणपत्र तयार करुन ते स्थायी समितीपुढे मांडले पाहिजे व त्यात त्यांच्या मते जे अन्य अधिकारी व कर्मचारी ठेवणे आवश्यक आहे त्यांची संख्या, पदनामे व श्रेणी आणि त्या प्रत्येकास जे वेतन, फी, व भत्ते देण्याची त्याने सुचना केली असेल त्यांची रक्कम व स्वरुप नमूद केले पाहिजे, अशी तरतूद आहे.<br>तथापि, नवी मुंबई महानगरपालिकेची विद्यमान लोकप्रतिनिधींची मुदत दिनांक ०७/०५/२०२० रोजी संपुष्टात आली असल्याने, उक्त नमूद केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल, आस्थापना व लेखा विवरणपत्र यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मा.आयुक्त तथा मा.प्रशासक यांच्या माहितीसाठी सादर करण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>नवी मुंबई महानगरपालिकेचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल, आस्थापना व लेखा विवरणपत्र मा. प्रशासक, नवी मुंबई महानगरपालिका यांना सादर करणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक ३७१२ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९४(१) अन्वये आयुक्ताने प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासनाव्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशीलवार अहवाल व उक्त वषात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरित केलेल्या रकमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणा-या विवरणपत्रासहित तयार करुन स्थायी समितीस सादर केला पाहिजे, अशी तरतूद आहे.<br>तसेच उपरोक्त अधिनियमातील कलम ५१(२) अन्वये आयुक्ताने वेळोवेळी एक विवरणपत्र तयार करुन ते स्थायी समितीपुढे मांडले पाहिजे व त्यात त्यांच्या मते जे अन्य अधिकारी व कर्मचारी ठेवणे आवश्यक आहे त्यांची संख्या, पदनामे व श्रेणी आणि त्या प्रत्येकास जे वेतन, फी, व भत्ते देण्याची त्याने सुचना केली असेल त्यांची रक्कम व स्वरुप नमूद केले पाहिजे, अशी तरतूद आहे.<br>तथापि, नवी मुंबई महानगरपालिकेची विद्यमान लोकप्रतिनिधींची मुदत दिनांक ०७/०५/२०२० रोजी संपुष्टात आली असल्याने, उक्त नमूद केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल, आस्थापना व लेखा विवरणपत्र यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मा.आयुक्त तथा मा.प्रशासक यांच्या माहितीसाठी सादर करण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(राजेश ज. नार्वेकर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका